# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ०७/०६/२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०५) इतिवृत्त**

**बुधवार** दिनांक **०७ जुन २००६** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.३० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. कावडे साहेबराव राणुबा
2. सौ. दलाल लता श्रीनिवास
3. श्री. पांडे विनायक प्रभाकर
4. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
5. श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
6. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
7. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
8. श्री. मो. जावेद मो. इसाक
9. श्री. सावंत मधुकर दामोधर

**<u>विषय क्र.31 :</u>**

सन 2004-2005 या आर्थिक वर्षातील वार्षिक लेखा परिक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**<u>संवादः</u>**

सौ.लता दलाल : सन 2004-2005 चा लेखा परिक्षण अहवाल समोर आलेला आहे. या कालावधीत अनेक चौकशा व घोटाळे यांचा ऊहापोह झालेला आहे. 2004 पर्यंत लेखा परिक्षण अहवालास मान्यता दिली. या अहवालात त्रृट्या असणार नाही असे वाटले. परंतु लेखा परिक्षण अहवालात त्रृट्या आहेत. त्रृट्यांची यादी देण्यात आली. ते पाहिल्यानंतर असे दिसून येते की, अद्यापही अनुपालन अहवाल सादर झालेले नाही. अहवालामध्ये काही ठिकाणी उपलब्ध फायलीनुसार असे नमूद केलेले आहे. उपलब्ध फाईल म्हणजे काय? उर्वरीत फाईल्सचा ताळमेळ बसणार का, याबाबत खुलासा व्हावा.

मा. सभापती : मुख्य लेखा परिक्षक यांनी कशा पध्दतीने अहवाल तयार केलेला आहे याचा सविस्तर खुलासा करावा.

मुख्य लेखा परिक्षक : सन 2004-2005 चा लेखा परिक्षण अहवाल साददर केलेला आहे. वार्षिक लेखा परिक्षण अहवाल दि.31.5.2006 रोजी मा.सभापती यांचेकडे सादर केला. सदर अहवालावर सविस्तर चर्चा व्हावी असे अभिप्रेत आहे. सन 2004-2005 मध्ये 2003-04 चे जमा खर्च यांचे लेखा परिक्षण करून अहवाल तयार केला व मा.स्थायी समिती समोर सादर करण्यात आलेला आहे. लेखा परिक्षण विभाग हा स्वायत्त विभाग असून स्थायी समितीच्या देखरेखीखाली काम करते. लेखा परिक्षण विभागात एकूण 13 पदे आहेत. शिपाई व वाहन चालक वगळता मुख्य लेखा परिक्षकासह 9 पदे आहेत. सन 2004-05 वर्षात फक्त 6 कर्मचारी उपलब्ध झाले. सन 2003-04 मध्ये 115 कोटी जमा व 110 कोटी खर्च असे सुमारे 225 कोटी जमा खर्चाचे लेखा परिक्षण करावयाचे होते. सन 1990-91 मध्ये या विभागासाठी कर्मचारी वर्ग (Staff) मंजूर करण्यात आला होता. त्यावेळी फक्त 36 कोटीचा अर्थसंकल्प होता.

सन 2005-06 मध्ये तेवढ्याच कर्मचाऱ्यांकडून संपूर्ण लेखा परिक्षण करणे शक्य होत नाही. ही बाब वेळोवेळी सभागृहासमोर मांडली. 2004 मध्ये सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानुसार ऑगस्टमध्ये 26 पदे मंजुरीसाठी शासनाकडे पाठविण्यात आलेली आहे. शासनाची मान्यता अद्यापही अप्राप्त आहे. पद मंजुरीसाठी मा.सभापती यांनी देखील शासनाचे कक्ष अधिकारी व उप सचिव यांचेकडे पाठपुरावा केलेला आहे. कर्मचारी मिळाले तर लेखा परिक्षणाचा उद्देश सफल होईल. सातत्याने पाठपुरावा चालू आहे.

सौ. लता दलाल : आपल्याला त्रास होतो ही सत्य बाब आहे. कर्मचारी कमी आहेत. परंतु मी ज्या विषयावर खुलासा मागितला होता त्याचे उत्तर अप्राप्त आहे. ज्या संचिका उपलब्ध झाल्या त्याबद्दल ठिक आहे, परंतु जे रेकॉर्ड मिळाले नाही त्याचे काय झाले? त्या संचिका गहाळ झाल्या किंवा संबंधीतांनी देण्यास नकार दिला, याबद्दलची माहिती हवी आहे.

मुख्य लेखा परिक्षक : लेखा परिक्षणाचा वर्षनिहाय कार्यक्रम तयार करण्यात येतो. कोणत्या कालावधीत कोणत्या विभागाचे लेखा परिक्षण करावयाचे याचा वार्षिक कार्यक्रम तयार करण्यात आला. त्यानुसार ज्या विभागाचे लेखा परिक्षण करावयाचे आहे त्यांना सात दिवस आगोदर लेखी पत्र देतो व लेखा परिक्षण करण्यासाठी जमा खर्चाच्या फायली उपलब्ध करून देण्यासाठी कळविण्यात येते. जे अभिलेख उपलब्ध होते त्यानुसार खर्च किती व जमा किती याची माहिती असते. जे अभिलेख उपलब्ध झाले व लेखा परिक्षणात ज्या त्रुट्या निदर्शनास आल्या त्याबाबत अर्धसमास शाखा प्रमुख व विभाग प्रमुख यांना लेखी सूचना करण्यात येते. लेखा आक्षेप अंतिम करून ते वितरीत करण्यात येते.

सौ. लता दलाल : जे लेखा परिक्षण झाले त्याची संपूर्ण माहिती आली का? उर्वरीत काही राहिलेले आहे का? संबंधीताकडून माहिती मागविण्यात आलेली आहे का?

मुख्य लेखा परिक्षक : सर्वसाधारणपणे अभिलेख उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. अभिलेख उपलब्ध करून न देणे बाबत आक्षेप नाही. सदर लेखा परिक्षण तत्कालीन मुख्य लेखा परिक्षक यांनी केलेले आहे. अभिलेख उपलब्ध करून दिले नाही असा ऊहापोह करता येणार नाही.

सौ. लता दलाल : सदर लेखा परिक्षण अहवालामध्ये नगर रचना विभागाचे, विविध विभागीय कार्यालयाचे लेखा परिक्षण अहवालात समावेश दिसत नाही. स्थायी समिती समोर सादर केलेला लेखा परिक्षण अहवाल अर्धवट असल्याचे दिसते.

मुख्य लेखा परिक्षक : लेखा परिक्षणाच्या वार्षिक कार्यक्रमानुसार मर्यादित कालावधीत लेखा परिक्षण करण्यात येते. जेवढे कर्मचारी उपलब्ध झाले त्यांचेकडूनच काम करून घेण्यात येते व समयबध्द कार्यक्रमानुसार जे शक्य आहे तेवढे लेखा परिक्षण करण्यात येते व जे लेखा परिक्षण करावयाचे राहिल ते पुढच्या वर्षी केले जाते.

मा. आयुक्त : कर्मचाऱ्यांची कमतरता आहे हे त्यांनी निदर्शनास आणून दिलेले आहे. पद निर्मितीचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. जर मंजूर पदांपैकी रिक्त पदे असतील तर ते पदोन्नतीद्वारे भरण्यात येतील. 26 पदे मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात आलेली आहे. शासनाकडून ही पदे मंजूर होण्याची शक्यता कमी वाटते. शासनाकडे पद निर्मितीचे तीन-चार प्रस्ताव प्रलंबीत आहेत.

मा. सभापती : या विभागाचे काम कसे होणार?

मा. आयुक्त : जेवढी पदे मंजूर आहेत तेवढी भरण्यात येतील. बाकीची कामे जी आऊटसोर्सद्वारे करून घेता येऊ शकतात अशा कामासाठी आऊटसोर्सची मान्यता देण्यात येईल. नवीन पदे भरणे शक्य होणार नाही, मात्र बळकटीकरण करू शकतो.

मुख्य लेखा परिक्षक : लेखा परिक्षण कामासाठी आऊटसोर्स करता येत नाही. टंकलेखनाचा प्रश्न नाही.

श्री.त्रिंबक तुपे : या विभागाकडे आवश्यक तेवढे कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे लेखा परिक्षणाचे पूर्ण काम करता येत नाही.

मा. आयुक्त : सर्वसाधारणपणे आपल्याकडे कर्मचारी नाही. प्रत्येक विभागामध्ये कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. जी पदे रिक्त आहेत ती भरण्यात येतील. पदे मंजूर होईपर्यंत आऊटसोर्सद्वारे जसे झेरॉक्स, संगणकावरील कामे, छपाई इ. करून 10-20 टक्केचा फरक पडू शकेल.

डॉ. आशा बिनवडे : लेखा परिक्षण अहवाल अपूर्ण आहे. कर्मचारी कमी आहेत परंतु महानगरपालिकेचे कामकाज कसे चालते हे यावरून दिसून येते. लेखा परिक्षणाचे आक्षेपावरील आवश्यक त्रृट्यांचे अनुपालन नाही. या अहवालात काही विभागांचा उल्लेख आलेला नाही. जसे नगर रचना विभाग, प्रकल्प विभाग, विधी विभाग इ. अर्धवट अहवालामुळे यावर्षाचे लेखा परिक्षण पुढील वर्षात होते. अर्धवट चर्चा व्हायला नको. लेखा परिक्षण पारदर्शक होणे आवश्यक आहे. विविध विभागात अफरातफर, गुन्हे इ. घटना होत आहेत. कारभार सुधारावयाचा असेल तर लेखा परिक्षणात सुधारणा होणे आवश्यक आहे. लेखा परिक्षणात सुधारणा कशी होणार याबाबत गंभीरतेने विचार होणे आवश्यक आहे.

श्री. हिंमतराव दाभाडे : अहवलात बऱ्याच त्रृट्या आहेत. स्टाफ कमी आहे तरी पण अहवाल सादर केलेला आहे. हा अहवाल नसून महानगरपालिकेचा आत्मा आहे. फाईल उपलब्ध होत नाही मग अहवाल का केला? यातून पळवाटा निघतील. पान क्र.29 पावती क्र.191-197 दिनांकात खाडाखोड आहे. नेमकी खरी कोणती तारीख आहे ते का टाकण्यात आले नाही. आपल्या मनाप्रमाणे काम करण्यात येते. अहवाल मंजूर करू नये. पुन्हा करण्यात यावा.

मा. सभापती : नगर रचना विभाग, प्रकल्प विभाग, विधी विभाग यांचे लेखा परिक्षणाचा अहवाल का आला नाही? मुख्य लेखा परिक्षक यांनी खुलासा करावा.

मुख्य लेखा परिक्षक : लेखा परिक्षणाच्या वार्षिक कार्यक्रमात सर्व विभाग अंतर्भूत केलेले आहेत. जेवढ्या विभागाचे लेखा परिक्षण करणे शक्य झाले ते करण्यात आले. जे राहिलेले आहे ते दुसऱ्या वर्षात घेतो.

मा. आयुक्त : लेखा परिक्षणासाठी विभाग निहाय प्राधान्यक्रम ठरवून घ्यावा.

मा. सभापती : लेखा परिक्षण अहवालात ज्या विभागाचे लेखा परिक्षण आलेले नाही त्यांचेही लेखा परिक्षण व्हावे.

सौ. लता दलाल : संपूर्ण विभागाचे लेखा परिक्षण अहवाल स्थायी समिती समोर यावे. एक विशिष्ट मुदत देण्यात यावी. तेवढ्या कालावधीत करण्यात यावे.

मा. सभापती : मा. आयुक्तांनी रिक्त पदे भरण्यात येतील व आऊटसोर्सला मान्यता देण्यात येईल असे सांगितलेले आहे. नगर रचना विभाग, विधी विभाग, प्रकल्प विभाग यांचा का समावेश करण्यात आलेला नाही याबाबत स.सदस्यांनी विचारणा केली आहे. महानगरपालिकेचे 35 शाखा/विभाग आहेत. फक्त 15 विभागांचा लेखा परिक्षण अहवालात समावेश आहे. एका विशिष्ट मुदतीमध्ये वार्षिक लेखा परिक्षण अहवला करण्याबाबत सन्माननीय सदस्यांच्या सूचना आहेत.

जोपर्यंत सर्व विभागाचे लेखा परिक्षण अहवाल येत नाही तोपर्यंत स्थायी समिती समोर अहवाल ठेवू नये. स.सदस्यांचे म्हणणे आहे की, सखोल लेखा परिक्षण व्हावे. अद्यापही 34 लेखा आक्षेप प्रलंबीत आहेत. सर्व विभाग प्रमुख यांनी आपापल्या विभागाशी संबंधीत लेखा आक्षेपांची आठ दिवसांत पुर्तता करावी. 34 आक्षेपांबाबत संबंधीतांनी गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी व आठ दिवसात अहवाल सादर करावा. मा.आयुक्तांनी सांगितल्याप्रमाणे कर्मचारी उपलब्ध करून देण्यात येतील. तुर्त प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सर्व विभागांचे लेखा परिक्षण करून एकत्रित अहवाल स्थायी समितीपुढे सादर करण्यास आणि 34 लेखा परिक्षण आक्षेपांची संबंधीत विभाग प्रमुखांनी आठ दिवसांत पूर्तता करण्यात यावी व सदर प्रस्ताव तुर्त स्थगित करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद